e-42.
...पन १९३८

प्रासादिक

# रणझुंजार मेळा.



—: पद्यावली १९३८ :—

प्रकाशक: दत्तात्रय विठोबा क्षिरसागर.
...नाथ बाळोबा मोरे.
...ी भाजीआळी पुणें शहर
(किंमत अर्धा आणा.)

REFBK-0005761
REFBK-0005761

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥



## श्रीसोमेश्वर प्रासादिक

# रणझुंजार मेळा.

## —: पद्यावली १९३८.

REFBK-0005761
REFBK-0005761

पद १ लें ( चालः- करारी दिलसे— )

गाम आमुचा तुम्हां गणेशा, करा मनोरथ ती पूर्ण आशा ॥ धृ० ॥
अनाथ-नाथा शिवा अनंता, न अंत पाही तूं दुःख हरीता ॥
अनन्य भावें आलो शरण आम्हीं, गजानना तव पदीं गणेशा ॥म० १॥
आनंद चित्ता तुम्हां बघोनी, विनंती परीसा आम्हां न कोणी ॥
असंख्य जनता अभागी बनता, कशी न चिंता तुम्हां गणेशा ॥ म० ॥ २॥

**पद २ रें ( चालः-तारका मंडला— )**

पुरवी मन कामना, करीं तव चरणीं दिन प्रार्थना ॥ धृ० ॥
शमी फळा तांबूला, स्वकरीं मोदक तुझ्या अर्पिला, भाळीं शेंदूर
मुषक वाहना, ॥ पुरवी० ॥ १ ॥
धरूनीं मनीं भावना, पुरवी निज हेतु पंचानना, दर्शन मंगल
तव गजवदना ॥ पुरवी० ॥ २ ॥

---

**पद ३ रें ( चालः- हांसोनी नाचोनी या— )**

पाहुं चला मंगला आनंदें, प्रेमें पदीं वंदू लोटांगणेशा ।
निजमानसी शांतता सौख्य नांदे ॥ धृ० ॥
करी मानवा जागृती धर्मकर्मा, या उद्धराया नरा स्वानंदे ॥ पाहुं ॥
बहके सदा क्षणिक मोहा भुलोनी, आली पराधीनता या नादे ॥पाहुं॥
तारीं प्रभो उद्धरीया जनांते, विनंती पदीं मोरया ही मोदे ॥पाहुं॥

---

**पद ४ थें ( चालः- गौळणी गे, गौळणी गे— )**

समरी चला, समरी चला, जाऊं चला, धावुं चला,
वंदु चला, शिव प्रभुला ॥ धृ० ॥
नरवीर हा शूर किती—रणशिंग फुंकित हा आला वीर भला ॥स०॥ १
घेई तान्हाजी शेलारमामा—उदयभानूशीं करी संग्रामा—
कां हा रुसला, हिरा हरपला, सिंह गेला, गड आला ॥स०॥२॥
[ पं. ता. गावडे

---

पद ५ वें ( चाल:-आधीं बीज एकलें- )

तान्हा करी गर्जना-जाई कोंडाण्याला-घेई दर्शना ॥ धृ० ॥
गड घेण्यासाठीं, फार मोठी, घेई पाठी, यशवंतीला ॥तान्हा०॥१॥
गड शिखराला चढुनी गेला, हाकारी मग उदयभानुला--कहर केला
घात जहाला-गेला-तान्हाजीला वार लागला ॥ तान्हा० ॥
शेलारमामा आले कामा, उदयभानुते पाठवी धामा-कळलेंहें
शिवबाला-बोल केला-सिंह गेला-गड लाभला ॥ तान्हा० ॥

---

पद ६ वें ( चाल:- उघडुनी नयनां- )

करी करुणा, गजवदना सगुणा-शांतीजना, प्रभु देई मना ॥ धृ० ॥
केल्या कृतीची करी क्षमा आतां कोप न व्हावा शांतवी पतिता
आमुची सत्ता द्यावी निज हाता, रात्रंदिन त्या भारत हृदयीं
भडकत ज्वालाग्नी नयनां. शांती जतां ॥ १ ॥
आणि बोल बोल करुणा करा, द्या हिंदी भारता आसरा
नाच अंत पाही तूं श्रीधरा, आनंदे स्वानंदे धांवत
करी सदना, पावन स्वमना, ॥ शांति० ॥ २ ॥

---

पद ७ वें ( चाल:- द्या हो मजला प्रीतीचा- )

किती तरी सुंदर खादी आपुली-दिसे ढवळी जणूं बिजली ॥ धृ० ॥
सूत काढी पहा टकली-हातमागावर ही विणली ॥ किती ॥
खादी कपडा उदया आला-किती भुलवी जगताला ॥ किती ॥
ब्लाऊझ झंपर पातळे साडी-ध्या भगिनी ही लुगडी ॥
विदेशी माला द्या बुडी-दास आपुला कर जोडी ॥ किती ॥
खादी माला खप बहु झाला-सुखी केलें गरीबाला ॥
तिरंगी झेंडा हा आला-वंदे मातरम् जय बोला ॥ किती ॥

[ पं. ता. गावडे

---

### पद ८ वें (चालः- कवाली—)

प्रेमसे कहो जय बजरंग जय हनुमान की ॥
वज्रदेही के हो तुम भक्त ना डर कोन की ॥ धृ० ॥
जान है भारत हमारा प्रेम है हनुमान पर ।
देशको स्वातंत्र्य करना बात ये हमको खबर ॥
तेरी मदतसे हम रक्षा करेंगे देशकी ॥ प्रेमसे० ॥ १ ॥
देशके दुष्मन बने एक माके दोनो लाल ।
इनको बचा हमको बचा ये सबका बोजा तूं समाल ॥
भक्तके आधार हम लाचार विनंती दास की ॥प्रेमसे०॥२॥

---

### पद ९ वें (चालः- ठेवी दया सदया—)

लढवी कोंढाणा, तान्हा—यशवंती यश देना, तान्हा ॥ लढवी ॥ धृ० ॥
हर हर हर जय मायभवानी—यश दे सर्वांना, तान्हा ॥ लढवी ॥ १ ॥
पंचानन जणूं लढे समरी हा—मावळचा राणा, तान्हा ॥ लढवी ॥ २ ॥
शीर पडे तुटूनी धरणी तरी—उभाचि मैदाना, तान्हा ॥ लढवी ॥३॥
चला जाऊं आज सिंहगडावरी—आनंदवु स्वमना, तान्हा ॥ लढवी ॥४॥

---

### पद १० वें (चालः- गोड गोड मुरली—)

आवड कां न पुरली, ऊरली ती, शिक्षण परकीय ते बदफैली,
स्वधन हिरावुन नेत परस्थली ॥ आवड ॥ धृ० ॥
आत्मिय भाष विनाशलय आतां, विलया जाई मातृभाषा ती,
मिळवील माती परकीय सुंदर, भ्रमवी सकळ नकली जगांती ॥आवड॥ १॥

---

क्र. ८०४ ता. २९/१०१३ ठाणें.

पद ११ वें (चालः- घ्या हो, घ्या हो— )

आपुला प्यारा, सारा स्वदेशी माल कधीं तुम्ही घ्याल बोला ॥धृ०॥
सर्व तऱ्हेचा माल स्वदेशी, बंधू आपुले बनविती देशी, परतोडीच्या जोडीचा सगळा ॥ सारा० ॥ १ ॥ माल खरेदी आपुला, द्या उत्तेजन त्याला, जरी तो वाईट असला, देशी घ्या द्या चाट विदेशी माला
॥ सारा० ॥ २ ॥

---

ठा

पद १२ वें (चालः- संशय कां मनीं आला— )

रणझुंजारा झणिं उद्धारा, आपुला हिंदुस्थान तारा ॥ धृ० ॥
शूरवीर तूं जवान असुनी, होसी कसा हैराण, वीरा ॥ १ ॥
ऐषआरामी मेजवानीनें, गेले तव अवसान, वीरा ॥ २ ॥
बनलासी व्यसनाधीन तरुणा, विसरूनीया अभिमान, वीरा ॥ ३ ॥
शूर मराठा किताब मोठा, विसरलासी मैदान, वीरा ॥ ४ ॥
पुर्वजनांना करूनी कलंकित, बनलासी सैतान, वीरा ॥ ५ ॥
उठा बंधुनो चला झुंजण्या, यश देईल भगवान वीरा ॥ ६ ॥

---

पद १३ वें (चालः- मन शुद्ध तुझं— )

चल उठ गड्या, घेई उड्या, आज सुखाची–वेळ आली, समिप
सोड, भिती मनाची–धरी भीड न त्याची ॥ धृ० ॥
राष्ट्रीय कॉंग्रेस रवी आज उदेला, मंत्रीपद जिंकूनी करी चीत रिपुला,
धन्य धन्य गांधी महात्मा, ही जगाची, मिळवुनी दिली सर्व जगां
किल्ली यशाची स्वातंत्र्यधनाची ॥ चल० ॥ १ ॥

वापरा स्वदेशी सर्व ध्येय आपुले, त्यजुनी सर्व व्यसनी ढंग कार्य चांगले, आपसांतील मिटवुं दुही, संघटनाची, आज असे जरूर जगा शुद्ध मनाची–तरुण वीराची ॥ चल ॥ २ ॥

---

पद १४ वें ( चालः–बोल हांसरे बोल– )

भाग्यशाली भारत कां, स्वस्थ कां बैसलासी आतां ॥ धृ० ॥
नष्ट दिन तव संपले ते, ऊठ वेगें रक्षणातें, राष्ट्र झेंडा स्वकरी घेई, फडकवी घेई स्वसत्ता ॥ भाग्यशाली ॥ १ ॥
राज्य ते कॉंग्रेस आपुले जिंकिलें कौन्सिल पहिले, तीच संस्था–पुज्य जगता, राहुं द्या ध्यानांत आतां ॥ भाग्यशाली ॥ २ ॥

---

पद १५ वें ( चालः–तुम्ही ने मुझको– )

राज्यसुत्र हे कौन्सिली चाले, अस्त्र अरीचे स्वकरी आले ॥ धृ०
मंत्रीपद कॉंग्रेस हाता, निजसत्ता खुलवी दिन जनता ॥
अनाथास नाथ करा मंत्रीजन,महात्माजी वदलें आपुले मन ॥राज्य
मंत्रीपद ही नव्हे पदवीधन, देशहितास्तव दिधले निवडुन ॥
निस्वार्थी मन तेही पहिलें, कार्य करा गरीबांचे पहिले. ॥ राज्य

---

पद १६ वें ( संवादः–गिरणी म्यानेजर व मजूर– )

मजूर–नका करूं राग आमच्यावरी मास्तर आमच्यावरी, इमा
इतबारे करूं नोकरी, अहो मास्तर. ॥ धृ० ॥

मास्तर–पाया पडलास तरी नाहीं करणार कधीं क्षमा आतां मी
तुझ्यावरी, आला तसाच बेट्या जाई घरी झाला खाडा ॥ १
मजूर–नका करूं जुलूम गरीबावरी हा गरीबावरी मारू नका आमच्या
पोटावरी, बाईल पोर उपाशी हो घरी, अहो मास्तर ॥ २ ॥
मास्तर–वटवट केलीस तर धक्के मारून तुला, बाहेर काढीन पठा-
णाच्याकरी, अक्कल काढीन तुझी बाहेर सारी जाई आतां ॥ ३ ॥
मजूर–पांच मिनिटासाठीं दिवसाचा खाडा, न्याय इन्साफ ठेवा थोडा
तरी, भाड्यापाई आम्ही रहातो दुरी, अहो मास्तर ॥ ४ ॥
मास्तर–मेलास तरी काय त्याचे आम्हाला, वागूं आम्ही आमचे
मर्जीवरी, वशिलेवाला आमचा खिसा भरी, जाई आतां ॥ ५
[–पैशासाठीं करीतां गरीबासी ठार, न्याय होईल याचा देवाघरीं
आमचे नशीब आमच्या दैवावरी अहो मास्तर ॥ ६ ॥
मास्तर–क्षमा करी दोस्त कळलें मला आज, आमच्यापेक्षां तुमची
दानत खरी, करणार नाहीं जुलूम गरीबावरी, लाग कामा ॥ ७ ॥
मजूर व मास्तर–गणपती बाप्पा द्यावी सुबुद्धि, गिरणी म्यानेजर-
मालकावरी, कृपादृष्टि ठेवी आमच्यावरी ॥ मंगलमूर्ति ॥ ८ ॥

---

पद १७ वें ( चाल:–चल ये साजणी– ) संवाद.

गमतो मज सुंदर व्यापार–नवलाचा ॥ १ ॥
बनवित गरीबांते सरदार. ॥ धृ० ॥
वद झणिं मित्रा काय असा हा योजिलासी व्यापार, ॥ २ ॥
मन माझें झालें उत्सुक ते अनिवार ॥

अमेरीकनचा कॉटन फिगर फाळो मी करणार, ॥ १ ॥
मिळती त्या दहा रुपयांचे एक हजार ॥
हर हर असला जुगारी धंदा खेळुनी होसील ठार, ॥ २ ॥
बघ डोळे, उघडुनी बनलें किती बेकार ॥
अपशकुनी तूं मित्र न माझा वदसी दुःखोद्गार ॥ १ ॥
मजपाशी शस्त्रगणित ज्योतिष आधार ॥
कोणी तुला हा मार्ग विषारी कथिला निंद्य आचार, ॥ २॥
फिरलें बा, दैव तुझें गोते खाणार ॥
मुर्खासम तूं बडबड करीशी अजुनी कसा अज्ञान, ॥ १ ॥
बघ माझें भाग्य मी मिळविन लाख हजार ॥
गेला तुमचा शहाणपणा नच व्यवहाराचे ज्ञान ॥ २ ॥
अविचारी, तरुणांनो बनला लाचार ॥
पुरे करा ही कटकट आपुली घ्या विश्रांती छान, ॥ १ ॥
ग्रह माझें, बलवत्तर करतील धनवान ॥
मंगलमूर्ति करी मम पूर्ति तूं आमुचा आधार, ॥ २ ॥
कैवारी मयुरेशा भारत द्वारा ॥

---

पद १८ वें ( चालः—झांशीची राणी—पोवाडा )

धन्य धन्य मुत्सद्दी वीर, गांधीजी फार, जवाहीर थोर, आणिक
किती वीर, पराक्रम गाजविला अनिमार, देशकार्यांत आहुति देणार
बंदीशाळेंत होती लाचार जी जी जी० ॥ १ ॥

कॉंग्रेस करूनी स्थापन, शपथ घेऊन, कार्यकारी जन, सोडूनी स्वकिय
आप्त करीती हे प्रसार देशांत, टकली चरख्याची माहती
गात–जी जी जी० ॥ २ ॥

खादीचा प्रसार पुढें केला, कायदेभंगाला, कीं बहिष्काराला पिकेटींग
केली दारुगुत्त्यांत, केला मीठ सत्त्याग्रह जोरांत, कायदा आला कीं
अस्तित्वात जी जी जी० ॥ ३ ॥

लोक होऊनी बेदरकार, करीती कारभार, घरोघरी फार स्वयंसेवक
ही रहाती तयार, सभेपुढें झेंडा फडकविणार, पुढें पोलीस धरूनी
नेणार जी जी जी० ॥ ४ ॥

विलायती कपड्यांवर, पिकेटींग फार, बाबु गेनु वीर पडूनी
त्यापुढें आडवा, केला तिनें गोऱ्यानें कावा, काय तो प्रसंग
सांगावा जी जी जी० ॥ ५ ॥

मोटार केली चालू भराभर, बाबु झाला ठार उसळला कहर, लोक
झाले तयार मरण्याला जुलूम सरकारी सोसण्याला, जोर चढला कीं
चळवळीला हो–जी जी जी० ॥ ६ ॥

पुढें जाहली चळवळ थंड, बेकारीच बंड, माजले प्रचंड, लोक शिव्या
देती महात्म्याला, म्हणती यानें देश नागविला, केली चळवळ घात
केला हो–जी जी जी० ॥ ७ ॥

चळवळीचा झाला परीणाम, देशीचा जोम, माल उत्तम, तयार
झाला आपुल्या देशांत, परदेशी माल नाहीं खपत, चूक आली
हिंदुच्या लक्षांत–जी जी जी० ॥ ८ ॥

निवडणुक कौन्सिलची आली, तयारी झाली, दुही माजली, झालें

दोन पक्ष गावांत, लोकशाही पक्ष म्हणती हो त्यांस, मुख्य तिथें
कूपर जमनादास जी जी जी० ॥ ९ ॥

निवडणुकी आल्या रंगांत, पक्ष दोन्ही लढत, लेक्चरे देत, जो तो
म्हणे मलाच निवडून द्या, कार्य तिथें करीन कसे मी पहाहो
जी जी जी० ॥ १० ॥

धन्य धन्य जवाहीर वीर, कार्यकारी फार निघाले दौऱ्यावर, गांवो-
गावी सभा भरविल्या फार, ऐकुनी सवाल, लोक करीती निर्धार सर्व
मतें कॉंग्रेसला देणार जी जी जी० ॥ ११ ॥

गांधींनें करूनी विचार, पाठवुनी तार, दिली आर्डर मंत्रीपद
स्विकारण्या बीनघोर, घटनेचा करूं पुढें विचार, मंत्रीपद आले चालू
अधिकार जी जी जी० ॥ १२ ॥

कॉंग्रेसनें पुढें कार्य केलें, कौन्सिल जिंकीलें, सूत्र हाती आले,
मंत्रीपद मिळालें खेरांना, वाटला आनंद लोकांना, कौन्सिलांत
झेंडा कीं फडफडला हो जी जी जी० ॥ १३ ॥

मुख्यमंत्री निवडले थोर, बाळ गंगाधर खेर, मुत्सद्दी फार,
राष्ट्र उत्कर्ष होण्यासाठीं, पगारांत कपात केली मोठी, रुपये केलें
बचत एक कोटी हो जी जी जी० ॥ १४ ॥

गांधीजी देत संदेश, मुख्य प्रधानांस, मंत्रीपद खास मुख्य उद्देश
देशसेवा, गरीब जनतेस सुखी ठेवा हो जी जी जी० ॥ १५ ॥

खेरांनीं चमत्कार केला, मुख्य साहेबाला, खादी सूट दिला,
कौन्सिलांत झेंडा फडकविला, खादीमय कौन्सिल हॉल
केला हो जी जी जी० ॥ १६ ॥

---

पद १९ वें ( चालः- कवाली— )

उठो भारत के प्यारे बने सुस्त तुम,
खोल देखो आंखे हाल देखो कां तुम ॥ धृ० ॥
नई रोशनकी फयाशन अबी छोड दो,
नकली वायल या मलमल न लाना करो,
पेनो हातो की खादी सबी घरमें तुम ॥ उठो० ॥ १ ॥
बने बेकार दुनियामें सब भाईबंध,
किया सबने अभितक ये व्यसनो का ढंग,
रहे निःसंग के संग नादान तुम ॥ उठो० ॥ २ ॥
खेलते रेस सट्टा गरीबो अमीर,
दारु ताडीसे लेकर उडाते है बीर,
भंग शिझर चहा कॉफी लेते हो तुम ॥ उठो० ॥ ३ ॥
उठो जागो भयानक समय आ रहा,
करो दर्शन प्रभुका मिले आसरा,
देश स्वातंत्र्य भारत बनो आज तुम ॥ उठो० ॥ ४ ॥

---

पद २० वें ( चालः- आला खुशीत समिंदर— )

बुवाबाजी शिकंदर, करीती बिलंदर, देती जगांला दगा,
बंधुनो सावधपणानें बघा ॥ धृ० ॥
बसती हे बोळां बोळांतुन, गावगुंड हाताशी धरून, म्हणे
देवीचा भक्त, मी पावन तुम्हाला करा नवस देवीला की
तोळाभर वाहीन सोनें तुला ॥ १ ॥

धारी लिंब आणा हो सात, खण लुगडे नाडा दहिभात, नारळ
परडी, सुपारी बरडी, रुपये सव्वा, उपरणें धोतर बिबवे
सहा ॥ २ ॥

मग येतो देव अंगांत, राखेचा अंगारा देत, सांगे सगळ्या
लोकांना भुताची बाधा देई गंडा ताईत जणूं हा
ब्रह्मदेवाचा सुत ॥ ३ ॥
विनंती ही भगिनी बंधुना, ठेवुनी अशा दुर्जना, करूं नका
हो भोळेपणा जसा हा चला शरण मोरया मार्ग हा असे
तुम्हा सुखवाया ॥ ४ ॥

---

पद २१ वें (चाल:- ललना मना— )

मन गुंगवी, मोहक तव कांती, भ्रांती चित्ता पडे ॥ धृ० ॥
मधूर तवही, मूर्ति सुंदर भक्त मनोरथ, कीर्ती अखंडीत,
जाहली चहुंकडे ॥ मन० ॥ १ ॥
दुःख हरीता, सुखविधाता, जगच्चालक प्रभुपालक जगीं या,
उद्धरी बापुडे ॥ मन० ॥ २ ॥

REFBK-0005761
REFBK-0005761

# श्री दत्त लॉन्ड्री.

१८० रविवार पेठ, तांबोळी मशीद.

चे येथें वुलन, सिल्क, सुती वगैरे सर्व तऱ्हेचें कपडे धुवून, रंगवून व ड्रायक्लिनिंग करून मिळतील.

प्रो. बा. म. राऊत.